# <u>जिंकूया आणि जगूया</u>

भ्रष्टाचाराच्या मुळावर

घाव घालूनी तडीपार करूया

लाच न देऊ लाच न घेऊ

पगारावर काम करूया जिंकूया आणि जगूया

रोप लावूया माणुसकीचे

प्रेम वर्षाने ते वाढवूया

अनाथ लाचार अबलांना

सुखी आपण ठेवूया जिंकूया आणि जगूया

छोटे नसे कोणतेही कर्म

वादविवादाने घडती अनर्थ

शांतचित्ताने विचार करूनी

शीतयुद्धाला जिंकू या जिंकूया आणि जगूया

नको शिफारस नको लाच ती

स्वकर्तृत्वाने पुढे जाऊया

नेटाने मग काम करूनी

संतुष्ट मनाने जगू या जिंकूया आणि जगूया